पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.स्थायी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक - १०८

**सभावृत्तांत**

दिनांक – **०७/०३/२०१९** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा **गुरुवार** दिनांक **०७/०३/२०१९** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात **मा.सुरज मांढरे (भा.प्र.से.), पिठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.गावडे राजेंद्र तानाजी
२. मा.आंगोळकर सागर सुनिल
३. मा.ममता विनायक गायकवाड
४. मा.करुणा शेखर चिंचवडे
५. मा.लोंढे नम्रता योगेश
६. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
७. मा.गीता सुशिल मंचरकर
८. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
९. मा.चोंधे आरती सुरेश
१०. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
११. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
१२. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
१३. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१४. मा.कलाटे मयूर पांडुरंग
१५. मा.कलाटे राहुल तानाजी
१६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

याशिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर - प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे - सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे.** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणुन आदेश क्र.नपा/१/कावि /१७२/२०१९ दि.०१/०३/२०१९ च्या आदेशान्वये त्यांचा प्रतिनिधी म्हणून विशेष स्थायी समिती सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून **मा.सुरज मांढरे, (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** यांना म्हणजे मला या ठिकाणी नियुक्त केलेले आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामाकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.

**(मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली.)**

**मा.नगरसचिव -** मा.स्थायी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार नेमणुक करणे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. मा.विभागीय आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नपा/१/कावि/१७२/ २०१९, दि.०१/०३/२०१९ अन्वये मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून **मा.सुरज मांढरे, (भा.प्र.से.), पिठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** यांची नेमणुक करणेत आलेली आहे.

मुदतीत तीन उमेदवारांनी एकूण ०४ (चार) नामनिर्देशनपत्रे दाखल केली असून नामनिर्देशनपत्रे छाननी करिता मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

(मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली ०४ नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन प्राधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन प्राधिकारी यांनी त्यांची छाननी केली.)

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे**. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता तीन उमेदवारांची एकूण ०४ (चार) नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | **कलाटे मयूर पांडुरंग** | पंकज दत्तात्रय भालेकर | खानोलकर प्रज्ञा महेश |
| २) | **मडिगेरी विलास हनुमंतराव** | गावडे राजेंद्र तानाजी | चोंधे आरती सुरेश |
| ३) | **मडिगेरी विलास हनुमंतराव** | आंगोळकर सागर सुनिल | करुणा शेखर चिंचवडे |
| ४) | **शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे** | कलाटे राहुल तानाजी | गीता सुशिल मंचरकर |

(या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे**

मा.सभापती, स्थायी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एकूण ०४ (चार) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून मा.कलाटे मयूर पांडुरंग यांनी एक नामनिर्देशनपत्र सादर केले असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक - सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ते वैध ठरले आहे. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव यांनी दोन नामनिर्देशन पत्रे सादर केली असून त्यांचे अ.क्र.२ चे पहिले व अ.क्र.३ चे दुसरे नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आणि वेगवेगळे स्थायी समिती सदस्य सुचक व अनुमोदक यांची स्वाक्षरी असल्याने त्यांची नामनिर्देशन पत्रे वैध ठरविण्यात येत आहेत. तसेच मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे यांनी एक नामनिर्देशन पत्र सादर केले असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक, सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ते वैध ठरले आहे.

सबब, स्थायी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) मा.कलाटे मयूर पांडुरंग**
**२) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव**
**३) मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे**

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन उमेदवारी मागे घेता येईल.

मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीत **मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे** यांनी आपली स्वाक्षरी केलेला उमेदवारी मागे घेण्याबाबतचा अर्ज समक्ष मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त केला व आपली उमेदवारी मागे घेतली.

( मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी १२.१० वा. ते १२.२५ वा. हा १५ मिनिटांचा अवधी संपला)

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे.** उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या वेळेमध्ये **मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे** यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असून निवडणूकी करीता मा.कलाटे मयूर पांडुरंग आणि मा.मडिगेरी विलास हनुमंतराव हे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

या नंतर निवडणूक प्रक्रीय पार पडेल. प्रथमत: नगरसचिव निवडणूक प्रक्रीयेची माहिती देतील. मा.नगरसचिव यांना निवडणूक प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश देत आहे.

(मा.नगरसचिव यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती दिली.)

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे.** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता निवडणूक लढविणारे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यांची इंग्रजी वर्णानुक्रमे नावे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १) | कलाटे मयूर पांडुरंग |
| २) | मडिगेरी विलास हनुमंतराव |

मा.पिठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी वर्णानुक्रमे प्रथम उमेदवार **मा.कलाटे मयूर पांडुरंग** यांचे नाव घोषित केले व ज्यांनी हात वर करुन त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावाची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.गीता सुशिल मंचरकर |
| २) | मा.खानोलकर प्रज्ञा महेश |
| ३) | मा.पंकज दत्तात्रय भालेकर |
| ४) | मा.कलाटे मयूर पांडुरंग |

त्यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी वर्णानुक्रमे द्वितीय उमेदवार **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांचे नाव घोषित केले. व ज्यांनी हात वर करुन त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावांची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.गावडे राजेंद्र तानाजी |
| २) | मा.आंगोळकर सागर सुनिल |
| ३) | मा.ममता विनायक गायकवाड |
| ४) | मा.करुणा शेखर चिंचवडे |
| ५) | मा.लोंढे नम्रता योगेश |
| ६) | मा.मडिगेरी विलास हनुमंतराव |
| ७) | मा.आरती सुरेश चोंधे |
| ८) | मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे |
| ९) | मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे |
| १०) | मा.लांडगे राजेंद्र किसनराव |
| ११) | मा.कलाटे राहुल तानाजी |
| १२) | मा.बारणे झामाबाई बाळासाहेब |

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे.** मा.सभापती, स्थायी समिती पदाकरीता हात वर करुन मतदान घेण्यात आले. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

i) एकूण स्थायी समिती सदस्यांची संख्या - **१६**

ii) मतदान केलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - **१६**

iii) मतदान न केलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - **००**

iv) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१) मा.कलाटे मयूर पांडुरंग - ०४ मते

२) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव - १२ मते

यावरुन **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांची मा.सभापती, स्थायी समिती पदाकरिताच्या मतदानात सर्वात जास्त मते पडलेली असल्याने **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांना सभापती, स्थायी समिती पदाकरिता वैधरित्या निवडून आल्याचे मी जाहीर करतो.

---------

ठराव क्रमांक - ४७०१ विषय क्रमांक - १
दिनांक - ०७/०३/२०१९ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सभापती, स्थायी समिती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांमधील तीन उमेदवारांपैकी उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या १५ मिनिटांच्या अवधीत **मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे** यांनी उमेदवारी मागे घेतली असल्याने निवडणूक लढविणारे **१) मा.कलाटे मयूर पांडुरंग, व २) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** हे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने नियमाप्रमाणे घेणेत आलेल्या मतदानामध्ये –

**१) मा.कलाटे मयूर पांडुरंग,** यांना - **०४ मते, २) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांना - **१२ मते** मिळाल्याने व यावरुन **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांना सर्वांत जास्त मते पडलेली असल्याने नियमाप्रमाणे **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सभापती, स्थायी समिती पदावर रितसर वैधरित्या निवडून आल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

( नवनिर्वाचित सभापती, मा.स्थायी समिती **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव** यांचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले**.**)

----------

यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
**( सुरज मांढरे,(,भा.प्र.से.) )**
**पिठासीन प्राधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे.**
स्थायी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१४७/२०१९
दिनांक : ०७/०३/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.